**नि.दि.दा.क्रं.०९/२०१७**
**गंगाधर वि. संभाजी**

**<u>नि.क्रं.४१० खाली आदेश</u>**

प्रतिवादी क्रं. ६ याने दि.प्र.संहीता १९०८ क्रम ६ नियम १७ अन्वये अर्ज देऊन नमूद केले की, प्रतिवादी क्रं. ६ यास मानसिक आजार असून त्यास उपचारांची गरज होती. वादीने सदर उपचार केले. प्रतिवादी क्रं. ६ याला विविध संस्थाच्या विविध शाळांमध्ये मिळालेली नौकरी मानसिक अनारोग्यामुळे तो पूर्ण करु शकला नाही. त्यामुळे तो पूर्णत: वादीवर अवलंबून होता. वादी हा एकत्र कुटुंबकर्ता होता. तो प्रतिवादी क्रं. १ व ६ यांच्या कुटुंबाचाही कर्ता होता. एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जित मिळकतींचे वाटप झालेले नाही. मात्र काही महसूली नोंदीमुळे वाटप झाल्याचे दर्शविण्यात आले. वादीने या मिळकतींची सुधारणा केली आणि त्याकरीता कर्ज घेतले. या कारणास्तव रे.दि.मु.क्रं.२०/२०१८ हा दावा दाखल झाला. तो दावा मागे घेण्यासाठी वादीने प्रतिवादींवर दबाव आणला आणि प्रस्तुत दावा वादीने दाखल केला.

२. वादीनेच प्रतिवादी क्रं. ६ करीता वकीलांची नेमणुक केली आणि त्याच्या मानसिक आजाराचा गैरफायदा घेऊन स्वत:ला फायदेशीर ठरेल अशी कैफीयत दाखल करुन घेतली. सदरची बाब प्रतिवादी क्रं. ६ च्या वादमित्रांना समजल्यावर प्र.वादी क्रं. ६ हा स्थिर मनोवृत्तीचा असताना त्याच्याशी वादमित्र बोलले आणि त्यावेळी कैफीयत ही वादीच्या लाभात दिल्याचे त्यांना कळले. त्यामुळे कैफीयतीतील परिच्छेद क्रं.५ ते १० वगळून त्याठिकाणी नवीन मसुदा नमूद करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दिला. साधारण पावणे तीन पानांची दुरुस्ती प्रतिवादी कैफीयतीतील मागतात. तो मसुदा अर्जात नमूद केला आहे आणि अर्जही मंजूर होण्याची विनंती करण्यात आली. अर्जासोबत नि.क्रं.४११ लगत शपथपत्रे देण्यात आले.

३. वादीने दिलेल्या म्हणण्यानुसार दि.१७/११/२०१८ रोजी काढलेले मुद्दे आणि दि.०२/०७/२०१९ काढलेले अतिरीक्त मुद्दे यावर वादीने दि.२३/०१/२०१९ रोजी आपला

पुरावा दिला आहे. प्रतिवादी क्रं. ६ ने त्याचा उलटतपास घेतला आहे. कैफीयतीतील कबूल्या मागे घेण्याचा प्रतिवादीला अधिकार नाही. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रं. १ ते ४ व ७ ते ८ यांच्याशी संगनमत करुन दिला आहे. त्यामुळे तो रद्द करुन देण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

**४.** उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रतिवादी क्रं. ६ हा दि.१६/०८/२०१७ रोजी वकीलांमार्फत हजर झाला. त्याने नि.क्रं.८२ लगत दि.२३/०१/२०१९ रोजी आपली कैफीयत दिली. सर्व पक्षकारांच्या वादकथनांवरुन दि.१७/११/२०१८ रोजी मुद्दे निघाले. ते पुढे दि.०२/०७/२०१९, १९/११/२०१९, १९/१२/२०२० व २१/०३/२०२२ रोजी सुधारले किंवा अतिरीक्त मुद्दे काढण्यात आले.

**६.** याकामी रिट याचिका क्रं.१०४५७/२०१८ ही राहूल संभाजी देपे यांनी वादीविरुध्द दाखल केली. गंगाधर यांनी संभाजीविरुध्द रिट पिटीशन क्रं.२०६५/२०२३ दाखल केले. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी निर्देश देऊन प्रकरण विहीत मुदतीत संपविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. वेळोवेळी याकामी प्रकरण निकाली करण्यासाठी या न्यायालयाकडून मा.उच्च न्यायालयाकडे विनंती करुन अवधी वाढवून घेतला आहे. मा.उच् न्यायालयाने आपल्या रिट पिटीशन क्रं.२०६५/२०२३ मधील दि. २१/०२/२०२३ रोजीच्या आदेशात परिच्छेद क्रं.९ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

***" It needs to be noted that the conduct of the petitioners cannot be appreciated in as much as the proceeding has been made time bound by this Court and thereafter parties do not co-operate in conducting the proceeding resulting in adjournments being sought for and Trial Court is being once again directed to adjourn the proceeding."***

**७.** दि.२३/०१/२०१९ रोजी नि.क्रं.७३ लगत वादीतर्फे गंगाधर याने सरतपास दिला. नि.क्रं.८५ लगत तृतीय पक्ष म्हणून दाव्यात हजर होण्यासाठी एक अर्ज दाखल झाला.

दि.१९/०९/२०२२ रोजी प्रतिवादींतर्फे गंगाधर या वादी सा.क्रं. १ चा उलटतपास पूर्ण झाला. सदर गंगाधर याचा जबाब ८५ पानांचा आहे. दि.०६/१२/२०२२ रोजी प्रतिवादीतर्फे राहुल संभाजी देपे याचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्रं. ४०७ दाखल झाले. त्याचा उलटतपास दि.२५/०८/२०२५ रोजी वादीने पूर्ण केला. राहूल याचा जबाब ७६ पानांचा आहे आणि प्रतिवादी क्रं. ६ करीता तो तहकूब करण्यात आला. या दरम्यानच्या काळात वेगवेगळे अर्ज उभयपक्षांनी दिले व त्यावर वेळोवेळी आदेश झाले.

८. प्रतिवादी क्रं. ६ च्या कैफीयतीमध्ये मागितलेली दुरुस्ती ही कैफीयत परिच्छेद क्रं. ५ ते १० हा पूर्ण अंशाने रद्द करुन मागितलेला मसूदा आहे. यावर प्र.वादी क्रं. ६ तर्फे वादीचा उलटतपास घेण्यात आलेला आहे. त्यामध्ये वादी साक्षीदार याला या कैफीयतींच्या अनुषंगानेच त्याला प्रश्न विचारण्यात आले. प्रतिवादी क्रं. ६ याने सदर राहूल या प्रतिवादी क्रं. १ याचा उलटतपास घेण्यापूर्वी सदर अर्ज देण्यात आला आहे.

९. अर्जाचा विचार करता त्यामध्ये प्रतिवादी क्रं. ६ हा मानसिक रुग्ण आहे असे प्रतिवादी क्रं. ६ ने कथन केले असले तरी दाव्यामंध्ये आणि प्र.वादी क्रं. १ ते ९ यांच्यापैकी कोणीही, तो मानसिक रुग्ण आहे म्हणून कैफीयतींमध्ये तक्रार उभारली नाही. मानसिक रुग्णाचा वतीने किंवा त्याच्याविरुध्द दावा दाखल करायचा झाल्यास तो वादमित्रामार्फत करावा लागतो किंवा वादमित्रांविरुद करावा लागतो. प्रतिवादी क्रं. ६ चा वादमित्र कोण आहे याचा उल्लेख दाव्यात किंवा कोणत्याही कैफीयतीत नाही. प्र.वादी क्रं. ६ यांनी स्वत: कैफीयत दाखल केल्यानंतर कधीही याबद्दल तक्रार उभारली नाही. कैफीयतीतील नमूद मजकूर चुकीचा आहे किंवा तो आपल्या मानसिक अवस्थेचा गैरफायदा घेऊन लिहीण्यात आला आहे किंवा तो वादीनेच त्याच्या दाव्यास सहाय्य होईल असा लिहीला आहे, अशा स्वरुपाची तक्रार प्रतिवादी क्रं.६ जरी या अर्जात करीत असला तरी त्याच्याच कथनाप्रमाणे तो मानसिक रुग्ण आहे आणि स्वत:च्या बचावासाठी वादमित्र न घेता तो स्वत:चा अर्ज आणि शपथपत्र दाखल करतो आणि पूर्ण बचाव बदलतो, हे अनाकलनीय आहे.

**१०.** वादपत्र दुरुस्तीचे निकष कैफीयतीला लावू नयेत, असे जरी असले तरी, लेखी दिलेल्या कबूल्या दुरुस्तीने काढून घेता येणार नाहीत. प्रतिवादी क्रं. ६ हा मानसिक रुग्ण असेल तर त्याने अर्जात नमूद केलेले तथाकथित वादमित्र हे त्याच्या वर्तणुकीविषयी समग्र पुरावा दाखल करुन सर्वात आधी वादमित्र म्हणून त्यांची नेमणूक होण्यासाठी प्रयत्न करतील. असे न करता थेट प्रतिवादी क्रं. ६ नेच तो स्वत: मानसिक रुग्ण असल्याचे नमूद करुन हा अर्ज दिला आहे.

**११.** सदर अर्जान्वये प्रतिवादी क्रं.६ करु मागत असलेली कैफीयतीमधील दुरुस्ती ही दि.प्र.संहीता १९०८ क्रम ६ नियम १७ मधील परन्तुकानुसार मान्य करता येत नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

**दिनांक: ०४/१०/२०२५.**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.